सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.१५७ / वार्ता.कक्ष /२०२२ दिनांक : १३ / ०७ / २०२२

# -: प्रेसनोट :-

## धारावी पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १२/०७/२०२२ रोजी ०७:०० वा. चे सुमारास फिर्यादी श्रीमती नसीम शौकत शेख व य ५० वर्षे, रा.ठी. रुम नंबर ४०५, चौथा माळा, ६ सी, बिल्डींग, पीएमजीपी कॉलनी, धारावी, मुंबई या ठिकाणी असताना यातील अटक आरोपी तडीपार असताना देखील फिर्यादी रहात असलेल्या घरी येवुन फिर्यादीची मुलगी नामे नाजनीन हिच्याकडे ठेवायला दिलेले ४०,०००/- रुपये परत मागण्याच्या कारणावरुन तीच्याशी वाद करुन तीला शिवीगाळ केली. फिर्यादी व त्यांचा मुलगा शोयब उर्फ पप्पु शेख त्याला समजावुन सांगत असताना शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्याकडील बंदुकीने त्यांचे दिशेने गोळी झाडली तसेच तेथे जमलेले लोक त्याला आडवण्यासाठी आले असता त्यांचे कडे बंदुक रोखुन ''अगर कोई सामने आया तो उसको जान से मार डालुंगा'' अशी धमकी देवुन लोकांमध्ये दहशत निर्माण केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गु.र.क्र.७६४/२२ कलम ३०७, ५०४, ५०६ (२) भादवि सह ३, २५, २७ भा.ह.का सह कलम १४२ म.पो.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.